महाराष्ट्र प्रादेशिक व नगर रचना अधिनियम १९६६
कलम १५४(१) खालील निदेश.

# महाराष्ट्र शासन

नगर विकास विभाग.
मंत्रालय, मुंबई- ४०० ०३२.
दिनांक - ०४ डिसेंबर, २०१३.

क्रमांक :- सुओआर-८१/२०१३/ नवि-११

वाचावे :- मा. मुंबई उच्च न्यायालयाकडील फौजदारी याचिका क्र. २७६१/२०११
सह ३५२८/२०११ मधील दिनांक २४/१०/२०१३ चे आदेश.

## आदेश

राज्यातील कारागृहांच्या सभोवतालील क्षेत्रामध्ये कारागृहाच्या सुरक्षिततेच्या दृष्टीकोनातून विकासावर नियंत्रण ठेवण्याची बाब शासनाच्या विचाराधीन आहे. दरम्यान, कारागृहालगतच्या उंच इमारतींमधून कारागृहातील कैदी यांच्या जीवाला धोका असल्याचा मुद्दा उपस्थित करुन कारागृहामधील सुरक्षिततेच्या बाबी संदर्भात मा. मुंबई उच्च न्यायालयामध्ये याचिकाही दाखल करण्यात आलेल्या आहेत. या पार्श्वभूमीवर राज्यातील कारागृहांच्या सभोवतालची ५०० मीटर अंतरामध्ये विकास परवानगी देण्यापूर्वी अशा विकास / पुनर्विकास प्रस्तावाची कारागृहाच्या सुरक्षिततेच्या दृष्टीने छाननी करुन संबंधित नियोजन प्राधिकरणास मार्गदर्शनासाठी एक स्थायी सल्लागार समिती नेमणे आवश्यक झाले आहे. याचा विचार करता महाराष्ट्र प्रादेशिक व नगर रचना अधिनियम, १९६६ च्या कलम १५४ अन्वये सर्व नियोजन प्राधिकरणांना पुढीलप्रमाणे निदेश देण्यात येत आहेत :-

**निदेश :-**

संबंधित नियोजन प्राधिकरणाने आपल्या कार्यक्षेत्रातील कारागृहांच्या सभोवताली ५०० मीटर च्या अंतरामध्ये यापुढे कोणतीही विकास परवानगी देण्यापूर्वी या निदेशानुसार गठीत करण्यात आलेल्या स्थायी सल्लागार समितीची पूर्व संमती घेणे अनिवार्य राहील. सदर स्थायी सल्लागार समितीची रचना व कार्यकक्षा खालीलप्रमाणे राहील.

१) **स्थायी सल्लागार समितीची रचना :-**

(अ) महानगरपालिका क्षेत्रासाठी-

राज्यातील महानगरपालिका क्षेत्रात महानगरपालिका क्षेत्रनिहाय खालील प्रमाणे स्थायी सल्लागार समिती राहील.

नगर रचना आणि मूल्यनिर्धारण विभाग
मु.का., पुणे -१ आवक क्र.
11 DEC 2013

(१) आयुक्त, महानगरपालिका — अध्यक्ष
(२) पोलीस आयुक्त — सदस्य
(३) कारागृह उपमहानिरीक्षक — सदस्य

(ब) राज्यातील नगरपरिषदा / नगरपंचायतीतील क्षेत्रासाठी —
सदर क्षेत्राकरिता जिल्हा स्तरावर स्थायी सल्लागार समितीची रचना खालीलप्रमाणे राहील:

(१) जिल्हाधिकारी — अध्यक्ष
(२) पोलीस आयुक्त / पोलीस अधीक्षक — सदस्य
(३) कारागृह उप महानिरीक्षक — सदस्य
(४) संबंधित नगरपरिषदेचे मुख्याधिकारी — सदस्य

(क) राज्यातील महानगरपालिका, नगरपरिषदा / नगरपंचायती व्यतिरिक्त क्षेत्रासाठी —
सदर क्षेत्राकरीता स्थायी सल्लागार समितीची रचना खालील प्रमाणे राहील:

(१) जिल्हाधिकारी — अध्यक्ष
(२) पोलीस आयुक्त / पोलीस अधीक्षक — सदस्य
(३) कारागृह उप महानिरीक्षक — सदस्य
(४) संबंधित जिल्ह्याचे सहायक संचालक नगररचना अथवा नगररचनाकार — सदस्य
(५) संबंधित भागासाठी नेमण्यात आलेल्या विशेष नियोजन प्राधिकरणांचे / नव नगर विकास प्राधिकरणांचे प्रमुख — सदस्य

२) <u>स्थायी सल्लागार समितीची कार्यकक्षा</u> :-

१) कारागृहासभोवताली कारागृहाच्या तटभिंतीपासून ५०० मीटर अंतरामध्ये प्रस्तावित सर्व विकास कामे या समितीच्या कार्यकक्षेत येतील. सदर समिती कारागृहासभोवताली ५०० मीटर अंतरामध्ये सर्व नियोजित विकास कामांच्या प्रस्तावांना कारागृहाची सुरक्षितता विचारात घेऊन व शासन यासंदर्भात वेळोवेळी जे मार्गदर्शक तत्व विहित करेल त्यास अधीन राहून मंजूरी द्यावी किंवा कसे आणि मंजूरी द्यावयाची असल्यास कोणत्या अटींवर अशी मंजूरी द्यावी याविषयी संबंधित नियोजन प्राधिकरणास मार्गदर्शन करेल.

२) स्थायी सल्लागार समितीचे मार्गदर्शन नियोजन प्राधिकरणांवर बंधनकारक असेल. मात्र एखादया प्रकरणी नियोजन प्राधिकरणास स्थायी सल्लागार समितीचे मार्गदर्शन मान्य नसेल तर नियोजन प्राधिकरणाने त्याविषयी शासनाच्या गृह विभागाकडे सविस्तर कारणे नमूद करुन संदर्भ करणे

आवश्यक राहील. अशा संदर्भाविषयी गृह विभाग नगर विकास विभागाशी विचार विनिमय करुन शासनाची अंतिम भूमिका ठरवेल व त्यानुसार सर्व संबंधितांना कळवेल.

उपरोक्त आदेश गृह विभागाच्या पुर्वसहमतीने निर्गमित करण्यात येत आहेत.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने.

( संजय बागाईत )
अवर सचिव, महाराष्ट्र शासन

प्रति,

१) मा. मुख्यमंत्री यांचे प्रधान सचिव.
२) मा. मंत्री (गृह) यांचे खाजगी सचिव.
३) मा. राज्यमंत्री (गृह) यांचे खाजगी सचिव .
४) मा. राज्यमंत्री ( नगर विकास ) यांचे खाजगी सचिव.
५) मा. मुख्य सचिव, महाराष्ट्र शासन.
६) अपर मुख्य सचिव, गृह विभाग, मंत्रालय, मुंबई.
७) अपर मुख्य सचिव, महसूल व वन विभाग, मंत्रालय, मुंबई.
८) महानगर आयुक्त, मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरण, वांद्रे, मुंबई.
९) प्रधान सचिव ( अ व सु ), गृह विभाग, मंत्रालय, मुंबई.
१०) प्रधान सचिव, नगर विकास विभाग-२
११) प्रधान सचिव, ग्राम विकास विभाग.
१२) प्रधान सचिव, गृहनिर्माण विभाग.
१३) प्रधान सचिव, उद्योग, उर्जा व कामगार विभाग.
१४) सचिव, सार्वजनिक बांधकाम विभाग.
१५) व्यवस्थापकीय संचालक, सिडको, नवी मुंबई.
१६) उपाध्यक्ष, म्हाडा.
१७) सर्व विभागीय आयुक्त.
१८) सर्व जिल्हाधिकारी.
१९) सर्व महानगरपालिका आयुक्त.
२०) पोलीस महासंचालक, महाराष्ट्र राज्य, मुंबई.
२१) पोलीस आयुक्त, मुंबई.
२२) मुख्य कार्यकारी अधिकारी, झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरण.
२३) अपर पोलीस महासंचालक तथा कारागृह महानिरिक्षक, पुणे.
२४) कारागृह उपमहानिरिक्षक, मुख्यालय (पुणे).
२५) सर्व अधीक्षक, मध्यवर्ती कारागृह / जिल्हा कारागृह.
२६) संचालक, नगर रचना, महाराष्ट्र राज्य, पुणे.
२७) सर्व नगरपरिषदांचे मुख्याधिकारी.
२८) निवड नस्ती.